वृत्तपत्राचे नांव - सकाळ
दिनांक - 23/9/2016

# मानवतेवरील विश्वास दृढ करून विश्वबंधुत्व जोपासा

## निवृत्त न्यायमूर्ती बन्नूरमठ; मानवी हक्कांबाबत कार्यशाळा



सोलापूर : सोलापूर विद्यापीठात गुरुवारी मानवी हक्क कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व केरळचे निवृत्त न्यायमूर्ती एस. आर. बन्नूरमठ, कुलगुरू प्रा. एन. एन. मालदार, आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, भगवंतराव मोरे, कुलसचिव डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा, प्रा. ई. एन. अशोककुमार, डॉ. माया पाटील व डॉ. प्रकाश व्हनकडे आदी.

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २२ : "जागतिकीकरणाच्या या कालखंडात अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. अशा स्थितीत मानवतेवरील आपला विश्वास दृढ करून, विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे," असे आवाहन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व केरळचे निवृत्त न्यायमूर्ती एस. आर. बन्नूरमठ यांनी केले.

सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात दोनदिवसीय चालणाऱ्या 'ह्यूमन राइट्स अँड ह्यूमनायजिंग सोसायटीज' य विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. कुलगुरू प्रा. एन. एन. मालदार अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, आयपीएस भगवंतराव मोरे, कुलसचिव डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक प्रा. ई. एन. अशोककुमार, चर्चासत्राचे समन्वयक डॉ. माया पाटील व डॉ. प्रकाश व्हनकडे उपस्थित होते.

**आजचे व्याख्यान**

कार्यशाळेत उद्या (शुक्रवार) हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके आदींची व्याख्याने होतील.

### कोण काय म्हणाले...

- कुलगुरू मालदार : आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरूक असतो, तेवढाच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करून आपल्या वागणुकीत बदल करावेत.
- एम. ए. सईद : मानवी हक्क हे प्रत्येकाला जन्मतःच प्राप्त होणारे हक्क आहेत व ते कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत. ाक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करून देणारे महत्त्वाचे ाधन आहे.
- ावंतराव मोरे : विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करावे. ाीजण खोटे दस्तऐवज तयार करून मानवी हक्काच्या क्षेत्रात ि करतो असे भासवून गैरवापर करतात. त्यांच्यावर कारवाई ार आहोत.